:: **<u>प्रेस नोट</u>** ::                दिनांक :- २२/१०/२०२४

**शासनाने प्रतिबंधीत केलेला ई-सिगारेटचा तीस लाखांचा साठा गुन्हे शाखेकडून जप्त.**

प्रतिबंधीत ई-सिगारेट मध्ये वापरण्यात येणारे निकोटीन हे शरीरास अपाय कारक असल्याने त्याचे उत्पादन, वाहतूक, साठवणुक, विक्री करण्यावर प्रतिबंध करून भारत सरकारने सन २०१९ मध्ये प्रोहिबेशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट ॲक्ट, २०१९ हा कायदा अंमलात आणलेला आहे. प्रोहिबिशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट ॲक्ट, २०१९ या कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश मा. वरिष्ठांनी दिले होते. जेणेकरून ई-सिगारेटची विक्री शाळा, कॉलेजच्या व इतर परीसरात होणार नाही व ई-सिगारेट विक्रीवर प्रतिबंध होईल त्यावरुन कक्ष-२ च्या पोलीस पथकास गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, जमाल ज्वेलर्स, शॉप नं. ०२, कटलरी मार्केट,मंगलदास मार्केट, मुंबई - ४०० ००३ या ठिकाणी फैजल जमाल मोतीवाला या इसमाने भारत सरकारने प्रतिबंध केलेल्या इलेक्ट्रॉनिक सिगारेटचा अनधिकृत साठा वितरण व विक्रीकरीता त्याच्या दुकानात ठेवला आहे. सदर ठिकाणी पोलीस पथक प्राप्त माहिती वरुन शहानिशा करणेकरीता नमूद ठिकाणी गेले असता सदरचा इसम त्याचे इमिटेशन ज्वेलरीच्या दुकानातुन ई-सिगारेटची ग्राहकांना विक्री करीत असल्याची माहिती मिळून आली. त्याबाबत अधिक माहिती घेतली असता सदरच्या इसमाने ई-सिगारेटचा मोठया प्रमाणात साठा त्याच्या फ्लॅट नं. १०४, आकाश अपार्टमेंट, घास गल्ली, आग्रीपाडा, मुंबई - ४०० ०११ येथे करून ठेवला असून ग्राहकांच्या मागणिप्रमाणे तो इलेक्ट्रॉनिक सिगारेट त्याचे घरुन आणून दुकानातुन विक्री करत असल्याची खात्री झाली.

त्यावरून दिनांक २१/१०/२०२४ रोजी गुन्हे शाखा कक्ष-२ चे दोन पथक तयार करण्यात आले ज्यामध्ये एक पथक त्याचे जमाल ज्वेलर्स, शॉप नं. ०२, कटलरी मार्केट,मंगलदास मार्केट,मुंबई - ४०० ००३ येथे व दुसरे पथक त्याचे राहते घराजवळ फ्लॅट नं. १०४, आकाश अपार्टमेंट, घास गल्ली, आग्रीपाडा, मुंबई - ४०० ०११ असे सापळा रचून थांबले असतांना फैजल जमाल मोतीवाला हा त्याचे दुकानात प्रतिबंधीत ई-सिगारेट असलेला एक कार्टून बॉक्स ज्यामध्ये २०० नग ई-सिगारेटचे विक्रीसाठी बाळगतांना मिळून आला. त्याच्याकडे अधिक विचारपुस केली असता त्याने प्रतिबंधीत ई-सिगारेटचा मोठया प्रमाणात साठा त्याचे राहते घरी आग्रिपाडा येथे करून ठेवला असलेबाबत माहिती दिली. त्यावरुन त्यास ताब्यात घेवून दोन्ही पथकांनी त्याची घर झडती घेतली असता घर झडतीमध्ये प्रतिबंधीत ई-सिगारेटचे चार कार्टुन बॉक्स त्यामध्ये एकूण ८०० नग प्रतिबंधित ई-सिगारेटचा साठा मिळून आला. सदरचा ई-सिगारेट विक्री करीता दिल्ली आणि मुंबई येथून आणत असल्याचे सांगितले.

इसम नामे फैजल जमाल मोतीवाला याने भारत सरकारने प्रतिबंधीत केलेला निकोटीनयुक्त ई-सिगारेट चा साठा करुन विक्री व वितरणासाठी पाच कार्टून बॉक्स मध्ये **ELFBAR** या कंपनीचे एकुण १००० ई-सिगारेटचे नग एकुण किंमत ३०,०००,००/- रूपयाचे ताब्यात बाळगताना मिळून आल्याने त्याचेविरुध्द लो.टि.मार्ग पोलीस ठाण्यात कलम ०७ व ०८ प्रोहिबेशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट ॲक्ट, २०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास गु.प्र.शा.गु.अ.वि., कक्ष-२, मुंबई करीत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण) श्री. दत्ता नलावडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण, श्री. दत्तात्रय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दिलीप तेजनकर, महिला पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली पवार, पोलीस उप निरीक्षक श्री. संजय भावे, पो.ह. अमोल साळुंखे, पो.ह. प्रशांत थिटमे, पो.शि. स्वप्निल डेरे, पो.शि. हरड, पो.शि फिरोज सय्यद, पो.शि. आव्हाड, पो.शि. चा. सुनिल पाटील, मपोशि विमल राठोड, मपोशि सपना जाधव यांनी केलेली आहे.